# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आर्वी

## <u>डेंगू आजार विषयक जनजागृती कार्यक्रम</u>




कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आर्वीच्या मराठी, हिंदी अंग्रेजी व एन. एस. एस.विभागाकडून **डेंगू आजार विषयक जनजागृती कार्यक्रम** संपन्न.

आज दिनांक 18 ऑक्टोंबर 2021रोजी उप जिल्हा रुग्णालय व ग्रामपंचायत मिर्झापूर नेरी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे मराठी, हिंदी, अंग्रेजी व एनएसएस विभागाकडून मिर्जापुर नेरी या गावात  डेंगू आजार विषयक जनजागृति सप्ताह अंतर्गत डेंगू जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम गावात जाऊन डेंगू आजाराविषयी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत मिर्जापुर नेरी ग्रामपंचायतचे उपसरपंच श्री बाळासाहेब सोनटक्के, ग्रामसेवक श्री आर. जी. शेंद्रे रोजगार सेवक श्री विजय कटाने, केअर इंडिया संयोजक श्री हर्षल मुंद्रे, तसेच आय.सी.टी. सी.केंद्र, उपजिल्हा रुग्णालय समुपदेशक श्री राहुल शेंडे, इंग्रजी विभाग प्रमुख श्री  डॉ. विजय खडसे, डॉ. अनुप गुंबळे, डॉ.नीरज केंडे, मराठी विभागाचे डॉ. प्रविण काळे, डॉ. सुधाकर भुयार, हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. श्यामप्रकाश पांडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी  प्रा. नागेश खोब्रागडे आणि महाविद्यालयाचे विद्यार्थ्यी उपस्थित होते. रॅलीच्या माध्यमातून गावात डेंगू विषयक जनजागृती करण्यात आली.

नंतर ग्रामपंचायत कार्यालय मिर्जापुर(नेरी) इथं कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात  राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर  यांच्या प्रतिमेचे पूजन करून शुभारंभ करण्यात आले.

नंतर श्री राहुल शेंडे यांनी डेंगू विषयी माहिती दिली व त्याच्यातून बचावाचे उपाय समजावून सांगितले तसेच आय.सी. टी. सी. केंद्र व एड्स विषयक माहिती दिली. या कार्यक्रमात श्री बाळासाहेब सोनटक्के व  उपस्थितांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाची अध्यक्षता सौ पद्माताई मुंद्रे यांनी केली.

कार्यक्रमाचे संचालन श्यामप्रकाश पांडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.नागेश खोब्रागडे यांनी केले. लक्ष्मी कोंडे, नीलिमा कामडी, कविता पालीवाल, चेतन चव्हाण, नताशा आचार्य, अंजली शर्मा, गुंजन डाकोत, महक परवीन शेख मतीन, आदित्य राऊत, चेतन राठोड, शिवम जाधव या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सहभाग  केले.




ICTC
MH SH 244, Maiwadi, Maharashtra 442201, India
Maiwadi
Maharashtra
India
27°C
81°F
2021-10-18(Mon) 12:59(pm)
Google


ICTC